# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22690007.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


प्रथम प्राधान्य/ईमेलव्दारे
कालमर्यादित

क्रमांक :- १०/एडीएम/पदविका/२०१८/१४२९
दिनांक:- 12 DEC 2018

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपुर, नाशिक, पुणे

विषय:- शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता विविध पदविका अभ्यासक्रमाच्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेसाठी अभिप्राय देणेबाबत...

संदर्भ : १. महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण क्रमांक २३२, दि. ०५.०७.२०१८.
२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय यांचे शासन निर्णय क्रमांक पत्र क्रमांक संकीर्ण- २०१५/ प्र.क्र. २५२/तांशि-४ दि. ०५.०७.२०१८.

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भाधिन अधिसूचना व शासन निर्णयान्वये आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र विनाअनुदानित व्यावसायिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनिमयन) अधिनियम २०१५ नुसार दि. १९ मे, २०१८ रोजी अधिसूचित करण्यात आलेल्या अधिसूचनेसोबतच्या अनुसूची 'क' (Schedule A) मधील व्यावसायिक पदविका पाठयक्रमापैकी अनुक्रमांक १ येथील 'अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदविका', अनुक्रमांक २ येथील 'औषधनिर्माणाशास्त्र पदविका' व अनुक्रमांक ३ येथील 'हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान पदविका' हे तीन व्यावसायिक अभ्यासक्रम दि. ०५.०७.२०१८ च्या संदर्भिय अधिसूचनेव्दारे / शासन निर्णयाव्दारे व्यावसायिक अभ्यासक्रमातुन पदविका अभ्यासक्रम वगळण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्वरीत संदर्भासाठी अधिसूचना व शासन निर्णयाची प्रत सोबत जोडत आहे. तसेच या पदविका अभ्यासक्रमांचे प्रवेश करण्यासाठी, प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या कक्षेत जाण्यापुर्वी तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत या पदविका अभ्याक्रमांच्या प्रवेशासाठी जी कार्यपध्दती उपयोगात आणण्यात येत होती सर्वसाधारणपणे तशीच कार्यपध्दती शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता व त्यापुढे अवलंबविण्याची कार्यवाही तंत्रशिक्षण संचालनालयाने करावी, असे संदर्भिय शासन निर्णयात नमुद करण्यात आले आहे. दि. ०५.०७.२०१८ रोजी संदर्भिय अधिसूचना प्रसिध्द झाल्यामुळे विविध पदविका स्तरावरील अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या कक्षेतुन संदर्भिय अधिसूचनेच्या दिनांकापासुन वगळण्यात आली असल्याने प्रवेश नियामक प्राधिकरणाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता पदविका अभ्यासक्रमाची सुरु केलेली प्रवेश प्रक्रिया संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत राबविण्यात आलेली आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता व त्यापुढे पदविका प्रवेश प्रक्रियेचे नियंत्रण करण्याची जबाबदारी संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची राहणार आहे.

त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये केंद्रिभूत प्रवेश प्रकियेच्या अनुषंगाने विभागीय कार्यालयास आलेल्या अडचणी तसेच आपल्या अधिपत्याखालील पदविका संस्था, अर्ज

स्विकृती केंद्र, प्रवेश निश्चिती केंद्राना केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया विषयी त्यांचे अभिप्राय / सुचना इ. आपल्याकडे लेखी स्वरुपात सादर करणेबाबत कळविण्यात यावेत. प्राप्त झालेले अभिप्राय / सुचना आपल्या स्तरावर विषयनिहाय एकत्रित करुन आपल्या अभिप्रायांसह या संचालनालयाच्या desk10@dtemaharashtra.gov.in या ईमेल आयडी वर दि. २१.१२.२०१८ पर्यंत सादर करण्यात यावेत. सदर अभिप्राय / सुचना शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या विविध पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशाचे नियम तयार करताना विचारात घेण्यात येतील. तसेच सदर अभिप्राय / सुचना सादर करताना खालील मुद्दे विचारात घेण्यात यावेत.

१. पदविका अभ्यासक्रमाच्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व समुपदेशन करणेबाबत.
२. केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेचा कालावधीबाबत.
३. विद्यार्थी स्थलांतरणाबाबत.
४. विविध प्रमाणपत्र पडताळणी करताना येणाऱ्या अडचणी
५. केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया राबविताना आवश्यक असलेल्या सोईसुविधा व मनुष्यबळ
६. संस्थास्तरावर प्रवेश घेताना येणाऱ्या अडचणी (Institute Level / Against CAP seats)
७. गुणवत्ता यादी तपासणी करताना येणाऱ्या अडचणी
८. पदविका अभ्यासक्रमाशी संबंधित न्यायालयीन प्रकरणे
९. इतर काही अभिप्राय / सुचना

(डॉ अभय वाघ)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई.

प्रत:- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

१. तंत्रशिक्षण संचालनालयस्तरावर विविध पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमावलीसंबंधीच्या कामासाठी गठित समितीतील सदस्य.
२. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर पत्र या संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.